जिल्हा क्रीडा अधिकारी,गट-अ मधील
अधिका-यांच्या बदल्यांसंदर्भात

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन आदेश क्रमांक- संक्रीआ-१०१८/प्र.क्र. ५४/क्रीयुसे-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : ३१ मे, २०१८

शासन आदेश -

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील तरतूदीनुसार व नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीस अनुसरुन सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या पूर्व मान्यतेनुसार क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या आस्थापनेवरील जिल्हा क्रीडा अधिकारी, गट-अ या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद अधिका-यांची बदलीने त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक ३ मध्ये दर्शविलेल्या पदावर पदस्थापना करण्यात येत आहे:-

अ.क्र.	नाव व पदनाम	बदलीनंतरची पदस्थापना	अभिप्राय
१	२	३	४
१	श्रीमती प्रमोदिनी अमृतवाड जिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे	जिल्हा क्रीडा अधिकारी, जालना	रिक्त पदी बदलीने
२	श्री. घनश्याम राठोड जिल्हा क्रीडा अधिकारी, नंदुरबार	जिल्हा क्रीडा अधिकारी, यवतमाळ	रिक्त पदी बदलीने
३	श्री. अशोक गिरी जिल्हा क्रीडा अधिकारी	जिल्हा क्रीडा अधिकारी, औरंगाबाद	रिक्त पदी बदलीने

२. सदर अधिका-यांनी त्यांच्या नवीन पदाचा पदभार त्वरीत स्विकारावा तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक- सीडीआर१०८२/२५६७/२८/अकरा, दिनांक ३० ऑगस्ट,१९९२च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन बदली रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

३. सदर आदेश सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

४. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांनी या आदेशाप्रमाणे सदर अधिका-यांना त्यांच्या सध्याच्या पदभारातून तात्काळ कार्यमुक्त करण्याबाबत संबंधित नियंत्रण अधिका-यांना तातडीने कळवावे व बदली झालेले अधिकारी विहित कालावधीत दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु होतील, याची खातरजमा करावी व याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०६०११०१३०७८९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.06.01 10:12:39 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सर्व उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा, (संचालनालयामार्फत)
३) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
४) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (संचालनालयामार्फत)
५) संबंधित अधिकारी (संचालनालयामार्फत)

प्रत माहितीसाठी-

१) मा.मंत्री,शालेय शिक्षण व क्रीडा यांचे विशेष कार्य अधिकारी
२) प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
३) कार्यासन अधिकारी(क्रीयुसे-१/३)
४) निवड नस्ती.